Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- X | ISSUE- VII | JULY | 2023 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.367 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# कोळी समाजाचा प्राचीन इतिहास

**प्रा.नितीन तुकाराम जाधव**
सहा.प्राध्यापक , इतिहास विभाग
कर्मवीर हिरे महाविद्यालय , गारगोटी
ntjadhav881@gmail.com

**प्रस्तावना :-**

कोळी ही जमात महाराष्ट्र ,गुजरात, मध्य प्रदेश इत्यादी राज्यात आढळते. विशिष्ट भागातच ती अनुसूचित जमात म्हणून मानली जाते. इतरत्र हे लोक इतर मागास प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट करण्यात आलेले दिसून येतात. सोनकोळी म्हणजे मासे मारणारे कोळी, ढोर कोळी, महादेव कोळी आणि मल्हार कोळी असे कोळ्यांचे विविध वर्ग आढळतात. महाराष्ट्रामध्ये कोळ्यांचे मुख्यत्वे दोन वर्ग पडतात. मासे मारणारे कोळी आणि शेती करणारे कोळी. महाराष्ट्रात मासे मारणारे कोळी, सोनकोळी या उपजाती आढळतात. हे लोक सर्व कोळी लोकांत आर्थिक व सांस्कृतिक दृष्ट्या सुधारलेले असल्याने त्यांचा अनुसूचित जमातीत समावेश होत नाही. फक्त महादेव व मल्हार कोळी यांचा समावेश अनुसूचित जमातीत होतो. या कोळ्यांच एकूण ८२ अनेक दृष्टीने साम्य असते ते कोकणात व देशावर आढळतात

**कोळी या शब्दाची उत्पत्ती —**

कोळी हे नाव कसे पडले ? याबाबत विचारवंतांमध्ये अनेक मतभेद असल्याचे दिसून येते. कोळी हा समाज कापड विणकारांचे काम फार पूर्वीपासूनच करत आला आहे. त्यामुळे विणणारा म्हणून कोळी हे नाव पडले असे उत्तरेकडील राज्यातील कोळी समाजाचे मत आहे. तर कोळी जातीचा एक कीटक जो जाळे विणून आपले भक्ष पकडतो, त्या दोघांमधील कर्म साम्यमुळे कोळी हे नाव पडले असावे. काही अभ्यासकांच्या मते कोळी म्हणजे जो नौका चालवितो तो कोळी या अर्थानेही कोळी या शब्दाची निर्मिती झाली असावी. कूल या संस्कृत शब्दापासून कोळी या शब्दाची उत्पत्ती झाली असावी असाही मतप्रवाह आहे. तर काही विद्वानांच्या मते कोळी हे प्राचीन भारतातील कुल या जमातीचे वंशज आहेत. कुल या शब्दाचा अपभ्रंश होऊन कोळी हे नाव निर्माण झाले आहे असे मानले जाते.

**कोळी समाज प्राचीन इतिहास :-**

**प्राचीन काळ :— सिंधू संस्कृती**

भारतातील अतिशय प्राचीन संस्कृती म्हणून सिंधू संस्कृती ओळखली जाते. तिचा कालखंड इ.स.पूर्व ३३०० वर्षापासून, इ.स.पूर्व १७०० वर्ष आहे. भारतीय समाज याच कालखंडात सांस्कृतिक विकासाच्या सर्वोच्च स्थानी पोहोचला होता. या प्राचीन कालखंडात सुद्धा कोळी समाजाने आपली सांस्कृतिक ओळख आणि अस्तित्व ठळकपणे जपलेले पहावयास मिळते.

प्राचीन काळी आर्य भारतात येण्यापूर्वीपासून भारतामध्ये रानटी अवस्थेत कोळ्यांचे वास्तव्य होते. असा इतिहासात उल्लेख आढळतो. त्याकाळी मानवाच्या विविध टोळ्या अन्नाच्या शोधात भटकंती करीत असल्यामुळे तो नेहमी अस्थिर होता. या भटक्या जातीमध्ये कातवाडी, भिल्ल, नाग, कोळी यांचा समावेश होतो. हेच भारतातील मूळ रहिवासी होते. आर्य भारतात येण्यापूर्वी या जमाती विविध टोळ्यांच्या स्वरूपात वास्तव्य करीत होत्या. त्यामुळे आर्यांच्या आगमनानंतर आर्य संस्कृतीचा प्रभाव त्यांच्या जीवनावर पडला असावा असे दिसून येते. काही ठिकाणी आर्यांनी आक्रमणे केल्याचे पुरावे आढळतात. आर्यांच्या पासून सतत होणाऱ्या युद्धाला घाबरून आपला प्राण वाचवण्यासाठी कोळ्यांना दुर्गम भागात स्थलांतर करावे लागले. कोळ्यांच्या काही टोळ्या सह्याद्रीच्या रांगा ओलांडून पश्चिम किनारयाकडे स्थालांतरीत झाल्या . तर काही उत्तर भारताच्या दिशेने गेले. ज्या प्रदेशात वास्तव्य केले तेथील पारंपारिक व्यवसाय करण्यास सुरुवात केली म्हणूनच आज विविध प्रदेशात विभागलेला कोळी समुदायाने वेगवेगळे व्यवसाय करताना पाहायला मिळतो .

इ.स.पूर्व ३२०० मध्ये सिंधू संस्कृती पासून भारताच्या जागतिक व्यापारास सुरुवात झाली. यासाठी सिंधू काळात लोथल या कृत्रिम बंदराची निर्मिती हे कोळी समाजाच्या दूरदृष्टीचे उत्तम उदाहरण आहे. कोकणातील चिडल सारखी प्राचीन बंदरे आजही या समाजाच्या सागर व्यापाराची साक्ष देतात. इजिप्त, अरबस्तान व अन्य अरबी आणि युरोपियन देशांशी ते व्यापार करत असत. यामध्ये मिठाचे योगदान अर्थातच महत्त्वाचे होते .यामागे कोळी समाजाची अपार कल्पकता, धाडस व साहसीपणा हे आपणाला पहावयास मिळते.

रेव एच. हेरास यांनी ' Kolikon in Mohan Jodado' या प्रस्तुत लेखांमध्ये सिंधू संस्कृतीमधील, मोहनजोदडो या प्राचीन शहराचा अभ्यास करून शहराची कोली या अदिम जमातीचा संबंध असल्याचे मत मांडले आहे. लेखकाच्या मते सिंधू संस्कृती तीन ते आठ हजार वर्षांपूर्वीची असून मोहेंजोदारो या शहराच्या उत्खननात सापडलेला एक अभिलेख असा वाचला जातो. 'Kolinal Maram' याचा अर्थ 'Many Treea of the Kolis' म्हणजेच 'कोळ्यांची अनेक वृक्ष,' यावरून कोळी जातीचा या संस्कृतीची जवळचा संबंध असल्याचे स्पष्ट होते. युरोपियन अभ्यासक कोली, कोळी आणि कुली या शब्दांच्या उच्चारणातील नाजूकतेचा भेद करू शकत नाहीत. त्यामुळे संपूर्ण अर्थच बदलून जातो. लेखकाने मोहजोदारो या शहराच्या केलेल्या अभ्यासामध्ये सध्याची कोळी जात ही प्राचीन कोली या जातीचे परिवर्तित रूप असल्याचेअगदी स्पष्टपणे म्हटले आहे.

सुमारे ५००० वर्षांपूर्वी अस्तित्वात आलेल्या आदिवासी जमाती मधून कोळी या जातीची उत्पत्ती झाली असावी असे लेखकाचे मत आहे. रामायण या महाकाव्याचे रचनाकार महर्षी वाल्मिकी हे या जातीचे असून, कोळी स्वतःला त्यांचे वंशज मानतात. प्राचीन भारतातील महान राजा चंद्रगुप्त मौर्य हे सुद्धा आदिवासी कोळी वंशाचे होते. ओम प्रकाश कोळी यांनी 'Origuns of Koris/Koli' कोळी प्रस्तुत लेखांमध्ये कोरी/ कोली या अधीम जातीची उत्पत्ती विषयी सविस्तर विवेचन केले आहे. लेखकाच्या मध्ये कोळी जातीला फार मोठा इतिहास आहे. कोळी हा शब्द प्राचीन कुली या शब्दाचे परिवर्तित रूप असून ती एक भारतातील प्रमुख अदिंम जमातींपैकी एक आहे.

**भारतातील कोळी जमाती समाजाची उत्पत्ती**

**सूर्यवंश**

कोळी जातीला हजारो वर्षाचा इतिहास आहे. कोळी जातीची उत्पत्ती ही 'कोल राजा' पासून झाल्याचे इतिहासात आढळते. कोल राजाची वंशावळ ही सूर्यपुत्र यम, ज्याला नरकाचा राजा म्हणून ओळखले जाते. त्या यमाला दोन पत्नी होत्या पहिली संज्ञा तर दुसरी वसू. यमाची दुसरी पत्नी वसु हिला आठ मुले होती .

यमाचा दुसरा मुलगा 'धनुष्याच्या' मुलाचे नाव 'कोल' होते. यापासून कोळी समाजाची उत्पत्ती झाली आहे. त्यामुळे कोळी सूर्याला आपला ईश्वर मानतात व स्वतःला सूर्यवंशी समजतात. आजही राजस्थानमध्ये सूर्यवंशी कोळी ही पोटजात म्हणून अस्तित्वात आहेत. त्याचबरोबर यमाचा प्रथम पुत्र धर याला 'रुद्रशिव' हा मुलगा आहे. होता रुद्रशिव याला दोन मुले झाली त्यांची नावे 'द्रविड' ज्याच्यापासून द्रविड जातीची निर्मिती झाली. तर 'हुन' पासून हुन जातीची निर्मिती झाली.. हून ला तीन मुलं झाली 'हयताल', 'कीरात', 'मंगोला'. हयतांलपासून, हरिताल जात, किरातपासून किरात जात तर मंगोला पासून मंगोला जातीची निर्मिती झाली. या जाती निर्मिती वेळी भारतामध्ये आर्यांचे आगमन सुद्धा झालेले दिसत नाही. भारतातील प्राचीन जातींमध्ये कोल, मंगोल, किरात, द्रविड, हुन यांचा समावेश होतो.

**कोल ऋषी- राजा राम**

कोळी समाजाची उत्पत्ती ही वाराणसी काशीचा राजा राम याच्यापासून झाली असावी .काशीचा नागवंशीय राजा राम यांना कुष्ठरोग झाल्याने त्यांनी राज्यकारभार सोडून पुढील उपचारासाठी हिमालयाच्या दिशेने प्रस्थान केले. नेपाळच्या तराई या भागातील कंदमुळच्या जंगलात एका ऋषीच्या आश्रमात त्यांनी आयुर्वेदिक उपचार घेऊन ते रोगमुक्त झाले. तिथेच याच रोगाने पीडित असणारी शक्य राजा संजयची बहिण 'संगात' (जयसेन) ही अयोध्येचा राजा रणजयची मुलगी यांना अत्यावस्थ स्तिथीत आढळली. राजाराम यांनी तीला आश्रमात नेऊन तिच्यावर उपचार केले. ती सुद्धा हळूहळू रोगमुक्त झाली. पुढे राजाराम व संघात यांनी विवाह करून त्या अरण्यात स्वतःची वस्ती निर्माण केली. त्यांनी ज्या कोल वृक्षांना (बोरफळ वृक्ष) साक्षी मानून विवाह केला व प्रतिज्ञा केली की, आपल्याला जी मुले होतील ती 'कोली' या नावाने ओळखली जातील. काशी नरेश राजाराम

कोल ऋषी यांच्यापासून कोळी वंश सुरू झाला. तर राजा संजय यांचा मुलगा शाक्य व साम्य हे दोघेही सूर्यवंशी विश्वाकू कुळातील आहेत त्यांनी जी वस्ती बसविली ती पुढे जाऊन देवदह रामग्राम, कोलवण या नावाने ओळखले जाऊ लागली. राजाराम व संघात यांना प्रथम मुलगा 'अंजन' झाला. हा या कोळवणचा प्रथम पुरुष होता. पुढे तोच त्यांचा शासक बनला आणि कोली वंशाची सुरुवात झाली.

**कोळी राजा - अंजन**

राजाराम कोल ऋषी यांच्यानंतर त्यांचा मुलगा अंजन हा गादीवर बसला. त्याची राजधानीचे नाव रामग्राम असे होते. राजा अंजन हा पराक्रमी होता त्याने आपल्या जवळची सर्व संस्थाने आपल्या राज्यात जिंकून घेतली. त्यांच्या अधिपत्याखाली ८४ पेक्षा अधिक संस्थाने होती . महाराजा अंजन यांना 'महामाया' ही मुलगी होती. तिचा विवाह 'राजा शुद्धोधन' यांच्याशी झाला. महामाया यांना 'सिद्धार्थ' हा मुलगा झाला .पुढे जाऊन तो गौतम बुद्ध या नावाने ओळखला गेला .म्हणजेच राजा अंजन हे गौतम बुद्धाचे आजोबा होते.

**कालगणना -**

गौतम बुद्धांचा जन्म इ.स. पूर्व ५६३ मध्ये झाला. त्यांची आई महामाया यांचा जन्म इ.स.पूर्व ५९१ मध्ये झाला. तर महामाया यांचे वडील राजा अंजन यांचा जन्म इ.स.पूर्व ६१९ मध्ये झाला. त्याचप्रमाणे राजा अंजन यांचे वडील कोल ऋषी यांचा जन्म इ.स.पूर्व ६४७ मध्ये झाला. कोळी वंशाची सुरुवात ही इ.स.पूर्व ६४७ मध्ये झाली असे मानले. तर आजच्या काळानुसार २६७० वर्षांपूर्वी कोळी समाजाची उत्पत्ती झाली आहे.

**कोलासूर -**

लेखक एलगोंडा यांच्या मते कोल ऋषी यांच्या अगोदर ११० वर्षे सध्याच्या महाराष्ट्र आणि कर्नाटकाच्या सीमेवरील काही भागावर कोलासूर या राजाचे राज्य होते. आर्यांनी त्यांचे राज्य जिंकण्याचा प्रयत्न केला पण त्यांना अपयश आले शेवटी त्यांनी महालक्ष्मी अंबाबाईला प्रार्थना करून कोलासुराचा वध करायला सांगितले. कोलासूर आणि महालक्ष्मी यांच्यामध्ये झालेल्या युद्धात कोलासुराचा पराभव झाला होता. पण त्याचा पराक्रम पाहून प्रसन्न होऊन अंबाबाई देवीने त्यांच्या राज्याला कोलासूर नगरी हे नाव दिले. आजही कोल्हापूर या नावाने सर्वत्र ओळखली जाते डॉ. गुलाबराव आपटे यांच्या मते कोलापूर किंवा कोल्हापूर ही कोळी जातीची मूळ नगरी आहे.

**महर्षी वाल्मिकी -**

महर्षी वाल्मिकी यांच्या कालखंडात कोळी जातीचा उल्लेख ठळकपणे आढळतो. भारतीय समस्त हिंदू समाजासाठी आत्मीयतेचा व श्रद्धेचा विषय असणारा रामायण हा काव्यग्रंथ आद्यकवी महर्षी वाल्मिकी यांनी रचला आहे .रामायण काळात महर्षी वाल्मिकी यांचा उल्लेख 'वाल्या कोळी' असा आढळतो. वाल्या कोळी हा निर्जन ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाटसरूंना लुटत असे. कधी कधी तो त्यांचा खून सुद्धा करत असे. हे सर्व कार्य तो आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी करत होता असे त्याचे मानणे होते . अज्ञानामुळे त्याला हे करणे म्हणजे पाप आहे असे वाटतही नव्हते .पण जेव्हा त्याला कळून चुकले की आपल्या या पापामध्ये वाटेकरी होण्यासाठी ज्यांच्यासाठी आपण हे सर्व करतोय ती आपली बायको मुले तयार नाहीत. तेव्हा त्यांचे मतपरिवर्तन झाले आणि त्यांनी आपल्या पापाचे प्रायश्चित्त करण्यासाठी तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. पुढे त्यांना ज्ञानप्राप्ती होऊन त्यांनी रामायण हे महाकाव्य लिहिले व ते आद्यकवी ‘महर्षी वाल्मिकी’ म्हणून ओळखले जाऊ लागले. रामायणामध्ये वाल्मिकींनी २४००० श्लोकांच्या सहाय्याने श्रीराम यांचा जीवन परिचय लिहिला आहे. आपल्या महाकाव्यामध्ये त्यांनी कालगणनेसाठी सूर्य ,चंद्र, अन्य नक्षत्र यांचे वर्णन केले आहे. यावरून ते एक महान ज्योतिषी व खगोलशास्त्री असल्याचे दिसून येते. अशा प्रकारे ते आपल्या कठोर तपश्चर्यामुळे ‘वाल्याचा वाल्मिकी’ म्हणून ओळखले जाऊ लागले .आजही महाराष्ट्रात एखाद्या वाईट वर्तन करणाऱ्या व्यक्तीमध्ये सुधारना झाली तर त्यासाठी 'वाल्याचा वाल्मिकी झाला' ही म्हण प्रचलित आहे.

प्रसिद्ध इतिहासकार ग्रँड डफ यांनी 'हिस्टरी ऑफ दि मराठा' या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील विविध जातींचा अभ्यास केला आहे. रामायण महाकाव्याचे रचनाकार महर्षी वाल्मिकी हे कोळी जातीचे होते त्यांना वाल्या कोळी म्हणून सुद्धा ओळखले जात होते. महाराष्ट्रातील कोळी समाज स्वतःला वाल्मिकी यांचा वंशज मानतो. वाल्मिकींना कोळी जातीचा ईश्वर म्हणून त्यांची पूजा केली जाते. यावरून असे दिसते की कोळी जात ही महाभारत कालखंडात सुद्धा अस्तित्वात होती.

त्यांचा इतिहास हा इ.स. पूर्व ५००० वर्षापर्यंत असल्याचे पुरावे इतिहासात अनेक ठिकाणी आढळतात.

काशी येथील तमसा नदी किनारी त्यांचे आश्रम होते. महर्षी वाल्मिकी यांच्या पश्चात त्यांच्या गादीवर कोळी जातींचे त्यांचा शिष्य 'भारद्वाज ऋषी' बसले .दहावे ऋषी श्री नारायण महाराज यांनी तो मठ सोडला व समदा या गावी, जिल्हा अमरावती या ठिकाणी महर्षी वाल्मिकी यांच्या गादीची स्थापना केली. आजही त्या मठामध्ये फक्त कोळी ब्रह्मचारी ऋषीच गादिवर बसविला जातो. आज ज्या गादीवर ३१ वे मठाधिपती प.पूज्य बालब्रह्मचारी श्री ज्ञानेश्वर प्रल्हाद ऋषी भांद्रेजी (कोळी) यांना १७ ऑक्टोबर २०१० ला दसऱ्याच्या मुहूर्तावर गादीवर बसविण्यात आले त्यांचे वय तेव्हा २५ वर्षे होते.

**राजा सगर -**

दशरथ पुत्र राम यांच्या २५ पिढी अगोदर होऊन गेलेला राजा सगर याने त्याच्या राज्यातील क्षत्रिय टोळ्या नष्ट करण्यास सुरुवात केली. यामध्ये शक, यवन, कांबरीज, पारद, कोळी, सर्प सहिष, दारद, चौल, कोरल, खस या क्षत्रियांनी राजा सगर पासून संरक्षणासाठी त्याचे कुलगुरू वशिष्ठ यांची शरण घेतली . वशिष्ठांनी राजा सगरला सांगितले की, मी या सर्वांना त्यांच्या क्षत्रिय धर्मापासून मुक्त करत आहे. तुला आता त्यांच्यापासून कसलाही धोका नाही. त्यामुळे राजा सगरने या जमातीचा नाश केला नाही. यावरून असे लक्षात येते की कोळी जात ही ४८७७ वर्षांपूर्वी सुद्धा अस्तित्वात होती.

**मत्स्यगंधा**

महाभारत काळात यमुना नदी काठी निशादाच्या म्हणजे कोळ्याच्या एका सुंदर मत्स्यकन्येचा उल्लेख आढळतो .तिच्या अंगातून दिव्य सुगंध परावर्तित होत असल्याने ती मत्स्यगंधा म्हणून नावारूपास आली. तिचे नाव सत्यवती होते. तिचा विवाह हस्तीनापुर नरेश शंतनू यांच्याशी झाला .सत्यवतीचा प्रथम पुत्र व्यास याला धृतराष्ट्र आणि पांडू ही दोन मुले झाली. पुढे धृतराष्ट्राला शंभर कौरव आणि पांडूला पाच पांडव पुत्र झाले आणि पुढे जाऊन त्यांच्यामध्ये महाभारत घडले .या कोळी कन्येला महाभारताची मुख्य नायिका म्हणून सुद्धा ओळखले जाते.

**क्षत्रिय कोळी**

वैदिक काळाच्या अंतिम कालावधी मध्ये प्राचीन भारतात मत्स्यराज हे कोळ्यांची सत्ता असलेले संस्थान होते. ते आजच्या राजस्थानातील अलवार, जयपूर ,भरतपूर या जिल्ह्यात अस्तित्वात होते. तेथील कोळी हा समाज लढवय्या होता. तो स्वतःला क्षत्रिय समजत असे. अत्यंत शीघ्रकोपी असा हा समाज अन्यायाविरुद्ध सतत बंड करून आपले हक्क मिळवत असत. त्यांच्या याच वर्तनामुळे तो इतर समाजापासून अलिप्त राहिला. त्याला वांशिक भेदभावाला सामोरे जावे लागले. आजही या भागातील कोळ्यांच्या पोट जाती कोली, क्षत्रिय कोळी, राज कोळी, राजपूत कोली, सूर्यवंशी कोळी, ठाकरे अशाच नावाने परिचित आहेत.

प्रसिद्ध इतिहास लेखक श्री उपेंद्रनाथ राय यांच्या 'बौद्ध धर्म आणि भारतीय संस्कृती' या पुस्तकांमध्ये कोळी समाजाच्या क्षत्रिय धर्माविषयी मत मांडले असून, त्यानुसार महाभारत काळामध्ये कोळी जातीला क्षत्रिय जात मानली गेली. ती जात ब्राह्मण अथवा वैदिक धर्माला मानत नव्हती त्यामुळे त्यांना ब्राह्मणांनी तुच्छ भ्रष्ट ठरवले होते. यावरून हे सिद्ध होते की एकेकाळी ब्राह्मण समाजाला कोळी जातीचे क्षत्रियत्व मान्य होते. परंतु कालांतराने वैदिक धर्म न मानल्यामुळे त्यांचे अस्तित्व धोक्यात आले.

**गौतम बुद्ध**

संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देणारे महात्मा गौतम बुद्ध यांचा कोळी जातीशी रक्तसंबंध आढळतो. शाक्यवंशीय राजा शुद्धोधन याचा विवाह कोळी राजा अंजन याची मुलगी महामाया यांच्याशी झाला. शुद्धोधन आणि महामाया यांचा मुलगा सिद्धार्थ ज्यांना संपूर्ण जग 'गौतम बुद्ध' या नावाने ओळखते. त्यांनी बौद्ध धर्माची स्थापना करून संपूर्ण जगाला शांततेचा व अहिंसेचा संदेश दिला. अंजनपुत्र सुप्रबुद्ध यांची मुलगी यशोधरा या दिसायला अतिशय सुंदर असणाऱ्या कोळी राजकुमारीचा विवाह इ.स.पूर्व ५४७ ला शक्य राजा सिद्धार्थ गौतम बुद्ध यांच्याशी झाला. पुढे त्यांना 'राहुल' नावाचा एक मुलगा झाला.

मागील दहा हजार वर्षांमध्ये ज्यांनी मानव कल्याणासाठी महान कार्य केले. अशा जगातील शंभर महामानवांची यादी इंग्लंडच्या ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने तयार केली आहे. त्यामध्ये गौतम बुद्धांना प्रथम स्थान देण्यात आले आहे. आचार्य रजनीश ओशो बुद्धां बद्दल म्हणतात की

बुद्धानंतर त्यांच्या जवळपास जाऊ शकेल असा महामानव भारताने किंवा जगाने आज पर्यंत निर्माण केला नाही .अशा या महामानवाचा जन्म कोळीवंशीय राजकुमारी महामाया यांच्या पोटी झाला.

लेखक रिस्क डेव्हिड यांनी त्यांच्या 'बौद्ध भारत' या ग्रंथामध्ये बौद्धकालीन घटनेचा उल्लेख केला आहे. त्यानुसार शक्य व कोलीय हे शेतीसाठी रोहिणी नदीच्या पाण्यावर अवलंबून असत. एका वर्षी त्यांच्यामध्ये रोहिणी नदीच्या पाण्याच्या वाटणीवरून संघर्ष पेटला. दोन्ही जाती आपापले सैन्य घेऊन युद्धासाठी एकमेकांसमोर आले. तेव्हा गौतम बुद्धांनी त्यांची समजूत काढताना म्हटले की शक्य आणि कोलीय क्षत्रियांचे रक्त हे रोहिणी नदीच्या पाण्यापेक्षा स्वस्त आहे का ? जे तुम्ही पाण्यासाठी रक्तपात करायला तयार झालात. या बुद्धांच्या बोलण्याचा दोघांवर परिणाम होऊन त्यांनी आपापले सैन्य माघारी घेतले व मोठ्या प्रमाणात होणारी जीवित हानी टळली. या घटनेवरून बौद्धकालीन कोळी हे क्षत्रियांमध्ये घडले जात होते हे सिद्ध होते.

**कोळी साम्राज्याचा अस्त -**

गौतम बुद्ध यांचा समकालीन प्रसेनजीत यांचा मुलगा 'विद्दभ' हा शाक्य कोलीय साम्राज्याचा अधिपती असून सुद्धा त्याला शाक्य व कोलीय रक्त शुद्धतेच्या कारणावरून स्वतःपेक्षा कमी लेखत असत. आपण राजा असून सुद्धा या सततच्या होणाऱ्या अपमानाचा बदला घेण्यासाठी राजा 'विद्दभ' यांनी सेनापती दिघकारायण यांच्या मदतीने कपिल वस्तूवर आक्रमण केले तेथील रहिवासी शक्य व कोलीय जनतेला मारण्यास सुरुवात केली .या आक्रमणामध्ये जवळपास ७०,००० शाक्य व कोली यांचा वध करण्यात आला. आपला जीव वाचवण्यासाठी शाक्य व कोली यांनी तेथून पळ काढला. ते नेपाळ, भूतान, तिब्बत आणि गंगा नदीच्या किनारी आश्रय घेतला व तेथेच त्यांनी वास्तव्य केले. त्यांनी त्यावेळी उदरनिर्वाहासाठी जे व्यवसाय मिळेल ते करण्यास सुरुवात केली. म्हणूनच आजचे कोळी विभिन्न ठिकाणावर विभिन्न व्यवसाय मध्ये गुंतलेले दिसतात .

इ.स.पूर्व १८७ साली मौर्य सम्राट 'बृहद्रथ' याचा वध करून सेनापती असणाऱ्या ब्राह्मण पुष्यमित्र शुंग याने सत्ता आपल्या हातात घेतली. ब्राह्मण समाजाच्या दांभिक षडयंत्रकारी व जातीयवादी वर्चस्वाला धक्का पोहोचवणाऱ्या बौद्ध धर्माचा बदला घेण्यासाठी बौद्ध वंशज व त्यांच्याशी रक्त संबंध असणारे त्यांचे सहकारी कोळीय यांच्याविरुद्ध युद्ध पुकारले. त्याने मध्यरेषा ते जालंधर पर्यंतची बौद्ध विहार नष्ट केली. निष्पाप बौद्ध व कोली यांचा नरसहार केला. लेखिका आर्य मंजुश्री यांनी त्यांच्या 'मुल-कल्पे' या ग्रंथामध्ये म्हटले आहे की, वैदिक व ब्राह्मण परंपरांचा कट्टर अनुयायी पुष्यमित्र शुंग हा बौद्ध व कोलीय वंशाचा द्रोही व शत्रू आहे. त्याने शक्य आणि कोलीय यांची घरे देवळे त्यांची ग्रंथालय जाळून नष्ट केली आणि कोल ऋषीपासून सुरू झालेल्या साम्राज्याचा अस्त झाला. या नरसहारातून वाचलेले कोळी आपल्या प्राण वाचवण्यासाठी इतरत्र स्थलांतरित झाले आणि त्यातल्याच व्यवसाय करून उदरनिर्वाह करू लागले.

**संदर्भ :-**

1. कठारे अनिल (२०१२) ‘ प्राचीन भारताचा इतिहास’, प्रशांत पब्लिकतिओन,जळगाव.
2. कोळी वरदराज (२००९)’ कोळी समाजातील अनमोल रत्न’, स्वागत प्रेस, इचलकरंजी.
3. डॉ खोडके ज.पा. (२०१२) ‘वाल्मिकी आणि वाल्मिकी मठ’,रतन प्रेस,अकोला.
4. डॉ.गरे गोविंद (२०१२) ‘ महाराष्ट्रातील आदिवासी जमाती’, कोन्तिनेन्तल प्रकाशन, अकोला.
5. चान्देरीया प्रसाद (२००३) ‘ शक्य कोलिय आलोक’, गुणार्थी प्रेस,वाराणसी.
6. परासार (२०११) ‘विष्णू पुरण , खंड-२’, वैदिक पब्लिकेशन ,लखनौ.
7. मांडे प्रभा, गाव गाड्या बाहेर ,परिमल प्रकाशन, औरंगाबाद ,1983 परिघाबाहेर रिसप्त संस्कृती
8. मोरवंचीकर राजश्री ,खानदेश इतिहास, जगताप संपा, ग्रंथातील प्रकरण वरळीकर रपू
9. पानसे मू.ग. 'यादव कालीन महाराष्ट्र,' ग्रंथ संग्रहालय, पृष्ठ 174 ते 177 प्रकाशन 1963.
10. Pargiter P.P. historical tradition among the puranas.
11. Morwanchikar r.s. 'python through the age', New Delhi ,1985
12. Thapar, romila,' ancient India'